# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/१८४/२०२१-२२
आयुक्त यांचे कार्यालय
दि. १८/०१/२०२२

**आदेश**

विषय:- विभागनिहाय समन्वय अधिकारी/कर्मचारी नेमणुकीबाबत.
संदर्भ:- दि.१७/०१/२०२२ रोजीच्या आढावा बैठकीतील चर्चा.

महानगरपालिकेच्या विविध विभागांशी संबंधित कामकाजाबाबत मंत्रालय स्तरावर तसेच विविध शासकीय कार्यालये, पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी आदींकडून माहिती मागविली जाते किंवा कामाबाबत विचारणा केली जाते. अश्यावेळी संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुख इतर कामात व्यस्त असल्यास किंवा कार्यालयात उपस्थित नसल्यास विभागातील इतर अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडून सदरची माहिती उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. सदर बाबत सोमवार दि.१७/०१/२०२२ रोजीच्या विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत चर्चा झालेली आहे.

त्यानुसार प्रत्येक विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी उपरोक्त कामी त्यांचे विभागाकरीता "समन्वय अधिकारी/कर्मचारी" यांची नियुक्ती करुन त्याची माहिती खालील तक्त्यात उपायुक्त (मुख्यालय) यांचेकडे सादर करावी. उपायुक्त (मुख्यालय) यांनी विभागांकडून प्राप्त माहितीची एकत्रित यादी करुन या कार्यालयास सादर करावी.

| विभागाचे नांव | समन्वय अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | पदनाम | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

(दिलीप ढोले)
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. उपायुक्त (सर्व)
२. विभागप्रमुख/खातेप्रमुख (सर्व)

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
अतिरिक्त आयुक्त (१) व (२)